# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा परिसरातील कुसूंबी जवळील ढोऱ्यापोऱ्या नदीवर पुल कम कोल्हापूरी सिंमेट बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट केल्याबाबत**

**(१) ५४८२ (०८-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा परिसरातील कुसूंबी जवळील ढोऱ्यापोऱ्या नदीवर पुल कम कोल्हापूरी सिंमेट बंधाऱ्याचे बांधकाम नित्कृष्ट साहित्याचा वापर केल्याची तक्रार ग्रामस्थांनी यवतमाळ येथील जलसंधारण व बांधकाम विभागाकडे केली असता सदर तक्रारीकडे संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे अखेर स्थानिक ग्रामस्थांनी निकृष्ट दर्जाच्या कोल्हापूरी बंधाऱ्यांचे बांधकाम बंद पाडल्याची माहिती दिनांक १७ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारण व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात निकृष्ट साहित्य वापरून बनावट काम करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) असल्यास, या उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-११-२०१५) :**(१) नाही.

तथापि, सदर प्रकरण यवतमाळ जिल्हयातील नसून नागपूर जिल्हयातील कुही तालुक्यातील पांढरकवडा, कुसुंबी या गावाजवळून वाहणाऱ्या ढोऱ्यापोऱ्या या नदीसदृष्य नाल्यावर कुचाडी को.प. बं-१ चे बांधकाम चांगल्या प्रतीचे झालेले असून ग्रामस्थांनी बंद पाडलेले नाही.

(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील महिला व नवजात शिशु रुग्णालय कार्यान्वित झालेले नसल्याबाबत**

**(२) ५९९८ (०८-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी मंजुर असलेले नाशिक येथील महिला व नवजात शिशु रुग्णालय माहे जानेवारी, २०१५ पर्यंत कार्यान्वित झालेले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) होय.

(२) सदर रुग्णालयाचे बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेची जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. जागा प्राप्त होताच बांधकाम तातडीने सुरु करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर - आजरा येथील सोहोळ राजीव गांधी सिंचन व कृषि विकास योजना बंद करण्याचा निर्णय अधिक्षक अभियंता कोल्हापूर यांनी घेतल्याबाबत**

**(३) ६४१९ (०९-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-आजरा येथील सोहोळ राजीव गांधी सिंचन व कृषि विकास योजना बंद करण्याचा निर्णय अधिक्षक अभियंता कोल्हापूर यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, ही योजना सुरु ठेवण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१५) :**(१) नाही.

तथापि, राजीव गांधी सिंचन व कृषि विकास योजनेअंतर्गत, मौजे सोहाळे, ता.आजरा, जि.कोल्हापूर येथील को.प.बंधाऱ्यांचे नुतनीकरण व दुरुस्ती करण्याचे काम कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, कोल्हापूर मार्फत प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपचायतीच्या कारभाराबाबत**

**(४) ७६९५ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपचायतीमध्ये प्रशासकांची नेमणूक असून प्रशासकामार्फत कामकाज चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हारे ग्रामपंचायतीध्ये कोणतीही बांधकामाची परवानगी न घेता व बांधकामासंबंधीचे मार्गदर्शक सूचनांचा विचार न करता बेकायदेशीर बांधकामे सुरु असल्याबाबत ग्रामस्थांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बेकायदेशीर बांधकामांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय टप्पा-२ च्या इमारतीचे बांधकाम अंतीम टप्प्यात असून या प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करण्याबाबतची मागणी**

**(५) १०२७७ (०७-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय टप्पा-२ च्या इमारतीचे बांधकाम अंतीम टप्प्यात असून या प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी रु.८.१६ कोटी मागणी करणारा प्रस्ताव मा.संचालक, आरोग्य, सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडे दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार निधीची उपलब्धता करुन देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे वजिराबाद जोडमार्ग मलकापूर बोदवड मार्गास जोडणारा रस्ता अत्यंत नादुरूस्त असल्याबाबत**

**(६) १०७५५ (०९-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे वजिराबाद जोडमार्ग मलकापूर बोदवड मार्गास जोडणारा हा ३ किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरूस्त असून या रस्त्यावरून सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी रू.९० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरूस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा यांना वेळोवळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) जिल्हा परिषद बुलढाणा, बांधकाम विभागाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही. तथापि सदर रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जागेचे उपलब्धतेनुसार तसेच निधी व निकष यांचे अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब तालुक्यात (जि.उस्मानाबाद) बनावट कागदपत्रे तयार करुन मग्रारोहयो अंतर्गत जवळपास अडीच कोटी रुपयाचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(७) १०९३३ (०७-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेंतर्गत कळंब तालुक्यात (जि.उस्मानाबाद) ८ कामे केल्याची बनावट कागदपत्रे तयार करुन मग्रारोहयो अंतर्गत जवळपास अडीच कोटी रुपयाचा गैरव्यवहार करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे तहसिलदार कळंब यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत माहे एप्रिल व मे, २०१३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी तहसीलदार तसेच उपविभागीय अधिकारी, कळंब यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) चौकशीमध्ये सदर कामे संबंधित यंत्रणे मार्फत झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बनावट दस्तऐवजांच्या आधारे तहसील कार्यालयामध्ये देयक दाखल झाल्याबाबत सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द गुन्हा नोंदविण्याबाबत तहसीलदार कंळब यांना आदेशित करण्यात आलेले आहे. तसेच कंत्राटी कर्मचारी वगळता इतर अधिकारी/कर्मचारी विरुध्द विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच तहसील कार्यालयातील कंत्राटी कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्यात आलेली आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हा परिषदेत वर्ग एक व वर्ग दोनची सुमारे १२४ पदे रिक्त असल्याबाबत**

**(८) ११०३७ (०७-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हा परिषदेत वर्ग एक व वर्ग दोनची सुमारे १२४ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३)तसेच, जिल्हा परिषदेतील वर्ग एक आणि वर्ग दोनची सर्व पदे तातडीने भरुन जिल्हा परिषदेचा कारभार पूर्ण क्षमतेने चालावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१) होय, माहे जानेवारी २०१५ अखेर वर्ग एकच्या अधिकाऱ्यांची २७ पदे व वर्ग दोन च्या अधिकाऱ्यांची ९७ पदे अशी एकूण १२४ पदे रिक्त होती.
(२) वर्ग एक व वर्ग दोन अधिकाऱ्यांची बदली झाल्याने, पदोन्नतीने, मयत झाल्यामुळे, सेवानिवृत्तीमुळे पदे रिक्त होती.
(३) सद्य:स्थितीत माहे एप्रिल, २०१५ मध्ये वर्ग एक व वर्ग दोन ची एकूण १६ पदे भरण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील १२ मंजूर पदांपैकी १० पदे भरण्यात आली असून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम व वाशी ही २ पदे रिक्त आहेत. सदर पदे बदलीने/सरळसेवेन/पदोन्नतीने भरण्यात येतील. तसेच गट-ब ची ११ पदे मंजूर असून ती सर्व पदे भरली आहेत.

जिल्हा परिषदेकडील विविध योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २३९ नुसार महाराष्ट्र विकास सेवा वगळून इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निर्माण करण्यात आली असून ती संबंधित प्रशासकीय विभागाकडून भरली जातात. जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांची सर्व रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनाला तालुक्यातील (जि.नागपूर) चिंचोली येथे बाजाराकरिता योग्य अशी जागा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(९) १११०१ (१०-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धनाला तालुक्यातील (जि.नागपूर) चिंचोली येथे बाजाराकरिता योग्य अशी जागा उपलब्ध नसल्याने भर रस्त्यातच आठवडा बाजार भरतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आठवडा बाजाराकरिता योग्य जागा उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :**(१), (२) व (३) ग्रामपंचायत चिंचोली, ता.मौदा, जि.नागपूर स्वत:चे उत्पन्न वाढविण्यासाठी लोक आग्रहास्तव आठवडी बाजार भरविते. बाजार भरविण्याकरिता ग्रामपंचायतीकडे स्वत:ची जागा उपलब्ध नसल्यामुळे बाजार रस्त्याच्या कडेला भरविण्यात येतो. आठवडी बाजाराकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत ग्रामपंचायतीने मागणी केलेली नाही.

---

**श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) गणेशा ते लिंपणगाव रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१०) १११६३ (१०-०४-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) गणेशा ते लिंपणगाव रस्त्याची दुरावस्था झाली असून लिंपणगाव ते शेंडेवाडी हा रस्ता डांबरीकरण झालेला असून शेंडेवाडी ते गणेशा या रस्त्याचे खडीकरण झालेले असून सदर रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्त्यात अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याची त्वरित दुरूस्ती करण्याबाबतची मागणी तेथील नागरिकांनी अनेकवेळा संबंधित अधिका-यांकडे करूनसुध्दा त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) गणेशा ते शेंडेवाडी हा रस्ता योजनाबाह्य आहे तसेच शेंडेवाडी ते लिंपनगाव हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ३७ असून सदर रस्त्यांची कामे साधारण पणे १५ वर्षापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून झालेली आहेत. त्यानंतर या रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे नुतनीकरणाचे काम झालेले नाही.
(२) ग्रामस्थांची मागणी जिल्हा परिषदेकडे प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घनसावंगी व अंबड तालुक्यातील (जि.जालना) रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(११) ११५४२ (०६-०४-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घनसावंगी व अंबड तालुक्यातील (जि.जालना) रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी विशेष निधीची तरतूद करुन रस्त्याची कामे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.
(३) अंबड व घनसावंगी तालुक्यातील ग्रार.मा.व इ.जि.मा. रस्त्यांची एकूण लांबी ९१५.३० कि.मी. इतकी असून त्यापैकी ५००.७० कि.मी. लांबीची दुरुस्ती करणे अवश्यक आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून जालना जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ५१२४.२० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रस्ते व पूल दुरुस्ती व परिरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन

२०१३-१५ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जालना जिल्हा परिषदेस रु.८९२.४२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये रु.३४१.५४ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी जालना जिल्हा परिषदेला सन २०१३-१४ मध्ये रु.५००.०० लक्ष असा एकूण रु.१७३३.९६ इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

जिल्हा परिषदेला वरील प्रमाणे उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी अंबड व घनसावंगी तालुक्यातील ग्रा.मा. व इ.जि.मा. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी रु.१३७.३१ लक्ष खर्च करण्यात आला असून ४०.२० कि.मी.रस्त्यांची लांबी दुरुस्त करण्यात आली आहे. दुरुस्ती केलेल्या रस्त्यांवरुन एस.टी.वाहतूक सुरळीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे दोन विभाग करणेबाबत**

**(१२) ११५७९ (०८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागाचे दोन विभाग आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही विभागाकडे १८०० कि.मी.लांबीचे रस्ते असून, जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे मात्र २५०० कि.मी. लांबीचे रस्ते आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेचा संपूर्ण जिल्हयासाठी केवळ एकच विभाग आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे सुध्दा दोन विभाग करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) शासन निर्णय क्र.रागांपं-२०१४/प्र.क्र.१४२/योजना-४ दिनांक १ ऑगस्ट, २०१४ द्वारे राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत ग्राम पंचायत स्तरावर पंचायत अभियंता (प्रति ग्रामपंचायत) व गट अभियंता (प्रति पंचायत समिती) ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने निर्माण करण्यात आलेली पदे विचारात घेऊन तसेच जिल्हा परिषदांकरिता उपलब्ध विभाग/उपविभाग, तांत्रिक मनुष्यबळ व कार्यभार विचारात घेऊन आवश्यक विभाग व उपविभाग निर्माण करण्याच्या जिल्हा परिषदांच्या प्रस्तावांचा आढावा घेऊन सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी सर्व जि.प.ना कळविण्यात आले आहे. तथापि, १२ जिल्हा परिषदांकडून माहिती प्राप्त झालेली आहे. उर्वरित जिल्हा परिषदांकडून सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक ०७ एप्रिल, २०१५ रोजी पुन्हा कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने उर्वरित जिल्हा परिषदांकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नवीन विभाग/उपविभाग व आवश्यक कर्मचारीवृंद निर्माण करण्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर ठेवण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे तालुक्यातील पुरमेपाडा येथील धरणाबाबत

**(१३) ११६५३ (०६-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे तालुक्यातील पुरमेपाडा येथील धरणात मोसम नदीचे वाहून जाणारे अतिरिक्त पाणी टाकून डावा कालवा काढावा अशी मागणी मा.महसूल मंत्री यांचेकडे आर्वी येथील बोरी खोरे विकास संघर्ष समितीमार्फत माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :**(१) होय.

(२) उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रत्यक्षात डावा वाढीव कालव्यासाठी किती पाणी उपलब्ध होऊ शकेल याबाबतचा अभ्यास क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

पाणी उपलब्धतेबाबतची निश्चिती झाल्यावर आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाचोरा तालुक्यातील आंबेवडगाव येथील आरोग्य उपकेंद्र गेल्या ९ महिन्यापासून बंद असल्याबाबत

**(१४) १२३२३ (०८-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा तालुक्यातील आंबेवडगाव येथील आरोग्य उपकेंद्र गेल्या ९ महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य सेवकाची बदली झाल्यानंतर व आरोग्य सेविका निवृत्त झाल्यानंतर या उपकेंद्रात दुस-या कर्मचा-याची नेमणूक केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे परिसरातील गावांच्या नागरिकांना आरोग्य सेवा व गरोदर महिलांसाठी जननी सुरक्षा योजना, योग्य वेळी लसीकरण व लोहयुक्त गोळया मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या ठिकाणी पुरेशा कर्मचा-यांची नेमणूक करणेबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. कंत्राटी पध्दतीने कार्यरत आरोग्य सेविकेमार्फत सदर सेवा पुरविण्यात येतात.
(४) पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. भरती व बदली प्रक्रियेत सदर पद भरण्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची स्थिती अतिशय खराब असल्याबाबत**

**(१५) १२४४६ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची स्थिती अतिशय खराब असून सदर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध होत नसल्याने रस्त्यांची दुरवस्था होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामीण रस्ते वाहतुकीसाठी सुस्थिती ठेवण्याकरिता निधी उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीची वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रस्ते व पूल दुरुस्ती व परीरक्षण य कार्यक्रमांअंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस रु.७६६.८८ लक्ष व तेराव्या वित्त आयोगामध्ये रु.२७३.०० लक्ष असा एकूण रु.१०३९.८८ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार चिपळूण तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग दर्जाच्या रस्त्यांची एकूण लांबी ८१५.९७ कि.मी. इतकी आहे. जिल्हा परिषदेला विविध योजनेतून योजनेत्तर कार्यक्रमातून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून सन २०१४-१५ मध्ये चिपळूण तालुक्यातील १८.४५० कि.मी. रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे करण्यात आली असून त्यावर रु. ३४०.६९ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सद्य:स्थितीत चिपळूण तालुक्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गावरुन एस.टी. वाहतूक सुरु आहे. सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण कार्यक्रमांतर्गत चिपळूण तालुक्यातील कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोट (जि.अकोला) तालुक्यात ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत

**(१६) १३५३५ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुका येथील जिल्ह्याच्या ठिकाणापासून सुमारे ६० कि.मी. अंतरावरील राज्य महामार्गालगत असल्याने वाढते अपघात, वाढती लोकसंख्या ग्रामीण रुग्णालयात अपुरी आरोग्य यंत्रणा लक्षात घेता या ठिकाणी ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन तसा अहवाल शासनाने मागविला आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कार्यवाही कुठल्या स्तरावर सुरु आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोट (जि. अकोला) ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१७) १३५३९ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्याची सव्वा लाख लोकसंख्या शहरालगत ९० ते ९५ खेडे असल्यामुळे येथील ग्रामीण रुग्णालयात ३० खाटांची व्यवस्था असल्याने, रुग्णाची वाढती संख्या, डॉक्टर व कर्मचारी कमतरता त्यामुळे दिवसेंदिवस आरोग्य सेवा विस्कळीत होत असल्याने रुणांवर योग्य उपचारा अभावी रुग्णाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील आरोग्याच्या नागरी सुविधासाठी होणाऱ्या गैरसोईबाबत शासनाने योग्य ती उपाययोजना केली आहे काय वा करण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर समस्येवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कुठलीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

अकोट येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धीत करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील मिरज मतदार संघातील ग्रामीण रस्ते,**
**इतर जिल्हा मार्गाच्या दुरुस्ती करणेबाबत**

**(१८) १४०८२ (०८-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील मिरज मतदार संघातील ग्रामीण रस्ते, इतर जिल्हा मार्गाच्या दुरुस्ती करणेसाठी दिनांक ३० मे, २०१३ रोजी या संदर्भात मा. लोकप्रतिनिधी मिरज यांनी ग्राम विकास विभागाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ग्रामविकास विभागाकडे मिरज ते सुभाषनगर रस्ता व मालगांव ते मल्लेवाडी रस्ता दुरुस्ती करणेसाठी मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, ग्रामविकास विभागाकडे सांबरवाडी मार्गे धुळगांव रस्ता २) कुपवाड ते कवलापुर रस्ता ३) मानमोडी-कांचनपुर मार्गे सोनी रस्ता ४) सोनी ते भोसे रस्ता ५) एरंडोली ते मल्लेवाडी रस्ता ६) एरंडोली ते गुंडेवाडी रस्ता ७) एरंडोली ते खंडेराजुरी रस्ता दुरुस्ती करणेसाठी मा.लोकप्रतिनिधी मिरज यांनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच सदर कामांना निधी मिळून कामे केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) ग्राम विकास विभागाकडे निवेदन प्राप्त नाही.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्यांपैकी मिरज ते सुभाष नगर, सोनी ते भोसे, एरंडोली ते मल्लेवाडी व एरंडोली ते गुंडेवाडी रस्ता हे ४ रस्ते प्रमुख जिल्हा मार्ग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहेत. उर्वरित ५ रस्ते ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीत असून त्यापैकी ३ रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी ग्रामविकास विभागाकडे करण्यात आली आहे.
(४) व (५) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सांगली जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८९२४.८२ कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी सांगली जिल्हा परिषदेस रु.३२२४.४५ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये रु.५८४.६९ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाड़ी सांगली जिल्हा परिषदेला सन २०१३-१४ मध्ये रु.५७१.०० लक्ष असा एकूण रु.४३८०.१४ इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

प्रश्नांकित रस्त्यापैकी अ) सांबरवाडी मार्गे धुळगाव रस्ता- सदर रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.११४ दर्जाच्या असून सदर रस्त्यावर जिल्हा वार्षिक योजना, पुरहानी कार्यक्रम तसेच रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत काम करण्यात आले आहे.
ब) कुपवाड ते कवलापूर रस्ता सदर रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.११३ दर्जाचा असून सदर रस्त्यावर रस्ते विशेष दुरुस्ती गट-ड मधून काम करण्यात आले आहे.

---

**इंडीया बुल औष्णिक विज प्रकल्पाला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यात आल्याबाबत**

**(१९) १५१२१ (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीचे पाणी वळवून नांदगांव पेठ (जि.अमरावती) स्थित इंडीया बुल औष्णिक विज प्रकल्पाला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यात आला असून या पाणी पुरवठा मोबदला म्हणून कौंडण्यपूर बॅरेज करीता रु. २३२ कोटीचा निधी पुर्नस्थापना खर्च म्हणून देण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा निधी शासनाकडे जमा करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, निधी अंतर्गत कौंडण्यपूर बॅरेजचे काम सुरु करण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाकरीता दोषी विरुध्द काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्याचे योजिले आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :**(१) व (२) अप्पर वर्धा धरणातून इंडीया बुल्स औष्णिक विज प्रकल्पाला ८७.६० दलघमी पाणी आरक्षण दि.२१/२/२००८ नुसार देण्यात आले आहे. त्याचा पुर्नस्थापना खर्च म्हणून २३२.१८ कोटी रुपये शासनास येणे आहे. यातील पुर्नस्थापना खर्चा करीता आज पर्यंत इंडिया बुल कंपनीने ११६.५७ कोटी रुपये भरणा केला आहे. उर्वरित पुर्नस्थापना खर्चाची रक्कम शासनाकडे भरलेली नाही व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

शासनाला दि. २७/४/२०१५ अखेर पर्यंत रुपये २०९.१७ कोटी इंडिया बुल कंपनीकडून येणे आहे. या निधी अंतर्गत कौंडण्यपूर बरॅजेचे काम प्रस्तावित नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील अनसिंग ग्रामीण रूग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्र वारला येथे स्थलांतरीत करण्यात आल्याबाबत**

**(२०) १५५१३ (०९-०४-२०१५). श्री.लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील अनसिंग ग्रामीण रूग्णालय सहा वर्षापूर्वी मंजूर झाल्याने अनसिंगचे प्राथमिक आरोग्य केंद्र वारला येथे स्थलांतरीत करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहा वर्षानंतरही स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायतीच्या दोन खोलीत प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार चालू असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र ग्राम पंचायतीच्या जागेमध्ये कार्यरत आहे. परंतु जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आलेले आहे, हे खरे नाही.
(३) स्वतंत्र जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अनेक गावांमध्ये एमआरईजीएस योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याबाबत**

**(२१) १५८१७ (०९-०४-२०१५). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अनेक गावांमध्ये एमआरईजीएस योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हजेरीपट गायब करुन कष्टकारी मजुरांचे पैसे दोन-तीन वर्षापासून देण्यात आलेले नाही सदर पैसे पंधरा दिवसात मजुरांना थकीत रक्कम द्यावी व दोषी संबंधितांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार सदर प्रकरणी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) थकीत मजूरी न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल. तसेच आंदोलन करण्यात येईल असे निवेदन जिल्हाधिकारी औरंगाबाद व विभागीय अधिकारी औरंगाबाद यांना देण्यात आले होते.
(३), (४) व (५) पैठण तालुक्यातील प्रलंबित हजेरी पत्रकाच्या अनुषंगाने तांत्रिक, प्रशासकीय व वित्तिय बाबींची तपासणी करण्याकरीता कार्यकारी अभियंता (सिंचन) यांच्या प्रमुखतेखाली

ग्रामपंचायत निहाय १३ पथकांची नियुक्ती करण्यात आली. सदर पथकांनी दिनांक २१/०१/२०१४ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये काही कामांमध्ये अनियमितता आढळून आल्याने जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे निष्कर्ष नोंदविले आहेत. त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही चालू आहे.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांनी त्यांच्या दिनांक २९/०४/२०१५ रोजीच्या अहवालात स्थळ पाहणीमध्ये कामे आढळून आल्याने अनियमिततेस संबंधितांना जबाबदार धरुन मजुरांची मजुरी देणे योग्य असल्याचे कळविले आहे.

त्यानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश दिनांक २१/२/२०१५ अन्वये काही अटींच्या अधिन राहून पैठण तालुक्यातील सन २०११-१२ व २०१२-१३ मधील प्रलंबित दायित्वास मंजूरी दिली आहे.

त्यानुसार हजेरी पत्रकासंबंधी तांत्रिक बाबींची पूर्तता करुन निधी वितरणाची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

**जळगांव नेऊर (ता.येवला) व विंचूर (ता. निफाड, जि. नाशिक) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२२) १८२७४ (१७-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव नेऊर (ता.येवला) व विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक २७ जुलै, २००९ रोजी शासनास सादर केलेला प्रस्ताव माहे मे, २०१५ पर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आरोग्य सेवा संचालनालयाने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार नाशिक जिल्ह्यात १६ ठिकाणी नवीन आरोग्य उपकेंद्र स्थापन करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) च्या अनुषंगाने शासनमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे अंशत खरे आहे.

जळगाव नेऊर येथे प्रा.आ.केंद्र मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दिनांक २९.०७.२००९ रोजी प्राप्त झाला आहे.

मौजे विंचूर येथे प्रा.आ. केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) हे अंशत खरे आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या कार्यालयाकडे ४ ठिकाणी नवीन उपकेंद्र मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी जानेवारी, २०१५ वा त्यादरम्यान मागणी केली आहे. परंतु यामध्ये मौजे विंचूर येथील प्रा.आ. केंद्राचा समावेश नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयाच्या ३० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत**

**(२३) १८२७६ (१७-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यासाठी करावयाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व भाग (२) बाबत शासनमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथर्डी (जि.अहमदनगर) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत**

**(२४) १८७५८ (१७-०८-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहमदनगर) येथील आनंदीबाई जोशी पुरस्कार प्राप्त उपजिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीसाठी गेल्या तीन वर्षात १ कोटी रुपये खर्च होऊनही त्यातील २१ स्नानगृहे व २३ शौचालये तांत्रिक बिघाडामुळे बंद असल्याने त्यांचा लाभ सर्वसामान्य नागरिक रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयाचे ड्रेनेज, शवविच्छेदनगृह व केबिनसाठी शासनाकडून निधी प्राप्त होऊन देखील कामे अद्याप सुरु केलेली नाहीत तसेच कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची अवस्था दयनिय झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले असल्यास, तसेच प्रश्न भाग १ व २ मधील अपूर्ण कामे व तांत्रिक दोष दुर करण्याच्या दृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्नाधीन कामांपैकी कर्मचारी निवासस्थान वगळता सर्व कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. तथापि कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रके सा.बां. विभागाकडून मागविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हा रुग्णालयाच्या कोटयवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या इमारतीचे साहित्य विनावापर पडून असल्याबाबत**

**(२५) १९७३८ (१४-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा रुग्णालयाची कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या इमारतीत कोट्यवधीचे साहित्य धुळखात पडून असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीचा व साहित्याचा वापर रुग्णांच्या उपचाराकरिंता करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, या रुग्णालयाचा व अद्यावत साधनसामुग्रीचा वापर रुग्णांकरिता केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) जिल्हा रुग्णालय आवारातील नविन बांधकाम करण्यात आलेली (१०० अतिरिक्त खाटा) इमारत सप्टेंबर, २०१३ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हस्तांतरीत झाली असून तेव्हापासून अद्यावत साधनसामुग्रीचा वापर रुग्णांकरीता करण्यात येत आहे.

---

**नागरिकांना स्वस्त औषधे मिळावीत यासाठी ३०० हून अधिक ठिकाणी जेनेरीक औषधांचे दुकाने सुरु करण्याबाबत**

**(२६) २३२१२ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औषधांच्या वाढत्या किमंतीमुळे राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त औषधे मिळावीत यासाठी ३०० हून अधिक ठिकाणी जेनेरीक औषधांचे दुकाने सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे सदरचे औषध दुकान सुरु करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करणार काय ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील सेलू-दूधना नदीवर असलेल्या कोल्हापूरी बंधा-याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२७) २४५५२ (१७-०८-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील सेलू-दूधना नदीवर असलेल्या कोल्हापूरी बंधा-याच्या दुरुस्तीसाठी लघुसिंचन विभागाने लाखो रुपये खर्च करुनही निकृष्ट बांधकामामुळे बंधाऱ्याची गळती माहे, एप्रिल, २०१५ पासून सतत चालू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंधाऱ्याची दुरुस्ती निकृष्ट पध्दतीने झाल्याने पाणी वाया जावून शेतक-यांना त्याचा फायदा काहीच झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे माहे एप्रिल-मे, २०१५ या महिन्यात पाणी टंचाईला तेथील शेतक-यांना सामोरे जावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील बंधारा तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-१२-२०१५) :**(१) होय खरे नाही.

कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद, परभणी यांनी दुधना नदीवरील बंधाऱ्याची पहाणी केली असता गळती सुरु असल्याचे आढळून आलेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.
(४) यापूर्वीच बंधारे दुरुस्त करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील साकलेता तालुक्यातील अंजातलाव लघु सिंचन प्रकल्पाबाबत**

**(२८) २४८७४ (१७-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील साकलेता तालुक्यातील अंजातलाव लघु सिंचन प्रकल्प सन १९९१ मध्ये पुर्ण करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकल्पात २३ कास्तकाराची जमीन संपादीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील २४ वर्षापासून संपादीत झालेला शेतकऱ्याच्या जमीनीचा मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-१२-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यातील साकलेता तालुक्यातील अंजातलाव अशा नावाचा तलाव नसून लघु सिंचन तलाव पिपरीया (आमनारा तलाव) ता.सालेकसा चे बांधकाम सन १९८१ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे.

सदर तलावासाठी संपादित करण्यात आलेल्या बुडीत क्षेत्रातील जमिनीचा मोबदला संबंधीत भुधारकाना मिळाला आहे. मात्र नहारा करिता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळालेला नसल्याचे कास्तकारांचे अर्ज दिनांक २६ मे, २०१४ रोजी प्राप्त झाले आहेत.

(४) कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे सदरचे अर्ज तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयात सुविधा मिळत नसल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२९) २५२७५ (१४-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील नवजात शिशु विभागात इंटरकॉमद्वारे संपर्क साधण्याची व्यवस्था नाही, लाईट गेल्यानंतरही इंटरकॉम बंद होत असून कोणत्याही सुविधा मिळत नसल्याने रुग्णांचे प्रचंड गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे जिल्हा रुग्णालय प्रशासन दुर्लक्ष करित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचे कारण काय,

(४) असल्यास, रुग्णालय प्रशासनाच्या गैरकारभारावर शासन काय कारवाई करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**१२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सन २०१७ पर्यंत घेण्यात आलेल्या कुष्ठरोग दुरीकरण मोहीमेकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत**

**(३०) २५३४२ (१७-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-१५ मध्ये अमरावती विभागात १४८१ कुष्ठरुग्ण आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत सन २०१७ पर्यंत हाती घेण्यात आलेल्या कुष्ठरोग दुरीकरण मोहिमेकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास राज्यातून कुष्ठरोग हद्दपार करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाय योजना केल्या आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय व कोणत्या उपाय योजना हाती घेण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०२-२०१६) :**(१) सन २०१४-१५ मध्ये अमरावती विभागातील ५ जिल्ह्यांमध्ये एकूण १६६३ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले होते.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार महाराष्ट्र राज्यात दरवर्षी विशेष कुष्ठरोग शोध व उपचार मोहिम राबवून शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांना बहुविध औषधोपचार मोफत देण्यात येतो.

तसेच सन २०१७ पर्यंत कुष्ठरोग दुरीकरण करण्याचा अनुषंगाने सन २०१५-१६ मध्ये राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदशक सुचनेनुसार, विशेष कुष्ठरोग शोध व उपचार मोहिम ३२ जिल्ह्यातील २०४ तालुके व मुंबई मधील २ ब्लॉकमध्ये राबविण्यात येणार आहे.

(३) कुष्ठरोगाचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने आरोग शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतर्गत रॅली, प्रश्नमंजुषा, वैद्यकीय अधिकारी, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांची कार्यशाळा, महिला मंडळ सभा तसेच दर्शनीय भागात बॅनर, पोस्टर, प्रदर्शने, होर्डींग्ज, हस्तपत्रिका वाटप, मेगाफोनद्वारे प्रचार, शालेय, आरोग्य तपासणी, वेळोवेळी सार्वजनिक आरोग्य सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेऊन, आरोग्य कर्मचारी व आशा वर्करमार्फत सर्वेक्षणाद्वारे नवीन संशयित कुष्ठरुग्ण शोधून वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रोगनिदान करण्यात येऊन बहुविध औषधोचार मोफत देण्यात येतो. (लवकर निदान व लवकर उचार हा एकमेव प्रतिबंधात्मक उपाय आहे.)

राज्यातील ३५ जिल्ह्यापैकी १५ जिल्ह्यांचे प्रमाण १ पेक्षा जास्त असून सदर जिल्ह्यांचे प्रमाण १ पेक्षा कमी करण्याचे नियोजन आखण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी अधिकारी (ता.उमरखेड ) यांच्यामार्फत जलसंवाहीनीची व विदर्भ पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत कामे न करताच करोडो रुपयांची देयके उचलण्यात आल्याबाबत.**

**(३१) २५७९८ (१४-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ ते २०१५ पर्यंत तालुका कृषी अधिकारी (ता.उमरखेड ) यांच्यामार्फत जलसंवाहीनीची व विदर्भ पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत उमरखेड तालुक्यातील फार मोठ्या प्रमाणात कामे केल्याचे दाखवून प्रत्यक्ष कामे न करताच करोडो रुपयांची देयके उचलण्यात आली आहेत या बाबतची उच्च स्तरीय चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासन कायदेशीर कार्यवाही करणार आहे काय,

(२) असल्यास, कामे करणाऱ्या संबंधित संस्थेने उमरखेड तालुक्यातील कामे न करताच अधिकाऱ्यांशी संगनमत करुन लाखो रुपयांची देयके काढली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सन २०१२ ते २०१५ मध्ये झालेल्या कामांचे तांत्रिकदृष्ट्या योग्य ते मूल्यमापन करुन मापन पुस्तिकेत नोंदणी करण्यात आलेली आहे. सदरची कामे ही मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात आलेली असून तांत्रिक मापदंडानुसार खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत कुठल्याही यंत्रधारकाकडून तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

सदर कामाची देयके पारित झाल्यानंतरच यंत्रधारकास देयकाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. याबाबत कुठल्याही यंत्रधारकाकडून तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वैजापूर तालूक्यातील ८ उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(३२) २५८३२ (१७-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर तालूक्यातील गावपातळीपर्यंत सर्वसामान्यांना प्रभावी आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्य उद्देशाने आरोग्य विभागाने २ वर्षापूर्वी ग्रामीण भागात १२ नविन आरोग्य उपकेंद्राना मंजूरी दिली होती. मात्र यातील केवळ ४ उपकेंद्रच कार्यान्वित असून ८ उपकेंद्र कार्यान्वित करण्यास कुठलीच हालचाल होत नसल्याने ही उपकेंद्र कागदावरच राहण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, येथील ८ उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :**
(१) व (२) औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात सन २०१३ च्या बृहत आराखड्यात १२ नवीन आरोग्य उपकेंद्राना मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी ४ उपकेंद्राच्या बांधकामाची सद्य:स्थिती निविदास्तरावर आहे. उर्वरित ८ उपकेंद्रापैकी कनकसाज व वांजरगांव या दोन उपकेंद्रास जागा प्राप्त झाली असून सदर उपकेंद्रे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यास्तव प्रस्तावित आहे. उर्वरित १) हाडस पिंपळगाव २) नायगव्हान ३) पानवी ४) वैजापूर (ग्रा) ५) वाघला व ६) लाख खंडाळा या सहा उपकेंद्राकरिता जागा उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३३) २६०५४ (१७-०९-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेची कामे पूर्ण करण्याची शेवटचा दिनांक ५ जून जलसंपदा प्रधान सचिव मालिनी शंकर यांनी अमरावती येथे आढावा बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी दिला होता असे वृत्त दिनांक २७ एप्रिल रोजी प्रसिध्द झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर्यापूर मतदारसंघातील जलयुक्त शिवार योजनेची कामे संबंधित अधिकाऱ्यांनी अद्याप प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधित कामे पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) दर्यापूर तालुक्यात ढाळीचे बांध, शेततळे, ठिबक/तुषार, नाला खोलीकरण अशा प्रकारची एकूण ७६४ कामे प्रस्तावित असून त्यापैकी २०६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

तसेच अंजनगाव सुर्जी तालुक्यात एकूण ४२३ कामे प्रस्तावीत असून त्यामधील ९७ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**बाळापूर तालुक्यातील ३५ गावांना दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(३४) २६१७४ (१७-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर तालुक्यातील ३५ गावांना दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याची बाब दिनांक १० जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत आरोग्य विभागाने गावातील पाण्याचे नमुने घेऊन तपासणी केली त्यानंतर १७ गावांना लाल व १७ गावांना पिवळे कार्ड देण्याचा निर्णय घेतला असल्याचेही आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्ड गावांना वितरित करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, सदर तालुक्यातील कोणत्या गावांना कोणते कार्ड देण्यात आले आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) हे खरे आहे. १८ गावांना लाल कार्ड व १७ गावांना पिवळे कार्ड देण्यात आले आहेत.
(४) बाळापूर तालुक्यात ६६ ग्रामपंचायती असून २०१५ च्या पावसाळापूर्व स्वच्छता सर्वेक्षणात १८ गावांना लाल व १७ गावांना पिवळे कार्ड व उर्वरित गावांना हिरवे कार्ड देण्यात आले आहे. (सोबत बाळापूर तालुक्यातील दुषित पाणी असलेल्या गावांची यादी जोडली आहे)

बाळापूर तालुक्यातील खालील गावांना लाल कार्ड देण्यात आले.

| अ.क्र. | प्राथमिक आरोग्य केंद्र | दुषित पाणी नमुने असलेल्या गावांची यादी | एकुण |
|---|---|---|---|
| १ | हातरुण | हातरुण, खंडाळा, मोरगांव, हासणापूर | ४ |
| २ | पारस | निरंक | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | उरळ | काझीखेड, कळंबा, बु.लोहारा, हाता, निंबा, उरळ बु. | ६ |
| ४ | वाडेगाव | बटवाडी, मांडवा, खामखेड, कुपटा, तागशी, चिंचोली, पिंपळगाव, कवठा | ८ |
| | | एकुण | १८ |

बाळापूर तालुक्यातील खालील १७ गावांना पिवळे कार्ड देण्यात आले.

| अ.क्र. | प्राथमिका आरोग्य केंद्र | दुषित पाणी नमुने असलेल्या गावांची यादी | एकुण |
|---|---|---|---|
| १ | हातरुण | टाकळी, निमकर्दा, गायगाव | ३ |
| २ | पारस | रिधोरा, व्याळा, दधम, पारस, जोगलखेड, कोळसा | ६ |
| ३ | उरळ | सोनगिरी, स्वरुपखेड, महागाव, कळंबा, दगडखेड | ५ |
| ४ | वाडेगाव | वाडेगाव, देगाव, चिंचोली | ३ |
| | | एकुण | १७ |

---

**नाचनवेल (जि.औरंगाबाद) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३५) २६४७० (१७-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाचनवेल (जि.औरंगाबाद) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाल्याने रुग्णांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे, तसेच येथे कायमस्वरुपी परिचारिका नसल्याने प्रसूतीकरिता महिला रुग्ण येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोग्य केंद्रात कायमस्वरुपी परिचारिका नेमण्यासंबंधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच या इमारतीची दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र नाचवनेल, जि.औरंगाबाद येथील इमारतीस तडे गेले असल्याने इमारतीची दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे. येथील कायमस्वरुपी आरोग्य सेविकेचे रिक्त पदाचा कार्यभार सारोळा येथील आरोग्य सेविकेकडे देण्यात आला असून या ठिकाणी माहे एप्रिल ते ऑगस्ट २०१५ अखेर १७ प्रसूती झाल्या आहेत.

(२) सदर पदे सरळसेवा/आंतरजिल्हा बदलीने भरणेबाबत कार्यवाही चालू आहे.
(३) इमारत दुरुस्तीची कार्यवाही सुरु आहे.

---

## जालना येथील महिला व बाल रुग्णालयातील सुसज्ज शस्त्रक्रियागृह विद्युत जोडणीअभावी बंद असल्याबाबत

**(३६) २६५८२ (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना येथील महिला व बाल रुग्णालयातील सुसज्ज शस्त्रक्रियागृह (ऑपरेशन थिएटर) एक्सप्रेस फिडरमधून विद्युत जोडणी न झाल्यामुळे बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्युत जोडणी करुन शस्त्रक्रियागार केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
जालना येथील महिला व बाल रुग्णालयात अत्यावश्यक सेवेकरिता २४ तास विद्युत पुरवठा होण्यासाठी एक्सप्रेस फिडरची व्यवस्था करण्यात आली आहे. शस्त्रक्रियागृह, प्रसुती विभाग व नवजात अर्भक केंद्र या विभागासाठी स्वतंत्र विद्युत जोडणी करण्यात आलेली असुन माहे डिसेंबर, २०१४ पासून शस्त्रक्रियागृह सुरु करण्यात आले आहे.

---

## नाशिक येथील शालिमार रुग्णालयाच्या आवारात शंभर खाटांचे रुग्णालय उभारण्याच्या निर्णयाबाबत

**(३७) २७०९७ (१७-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील शालीमार रुग्णालयाच्या आवारात शंभर खाटांचे रुग्णालय उभारण्याचा सन २०१३ मध्ये शासनाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे बांधकाम अद्यापी न होऊन रुग्णालय कार्यान्वित झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहरातील पाथर्डी येथील सर्वे नंबर ३०७ या रुग्णालयासाठी आरक्षित जागेवर १०० खाटांचे स्त्री रुग्णालय सुरु करण्यास तातडीने मंजूरी देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक ३ जून, २०१५ रोजी पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.
(४) कार्यवाही सुरु आहे.

---

**कळवण (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या गैरप्रकारामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(३८) २७२०७ (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांच्या मनमानी कारभारामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचा प्रकार माहे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांचा मानमानी कारभार व रुग्णालयातील अनुपस्थिती याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली काय,

(४) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१६-०२-२०१६) :**(१) उपजिल्हा रुग्णालय, कळवण हे १०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय असून तेथील एकूण सर्व १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आलेली आहेत. या रुग्णालयात जून, २०१५ मध्ये ४८३८ बाह्यरुग्ण तर ६५१ आंतररुग्णांना उपचार केला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे रुग्णांची गैरसोय झाल्याबाबत कोणतीही तक्रार झाल्याचे आढळून येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगांव) येथील तापी नदी पुलावरुन डिंकाची तस्करी करुन घेवून जाणाऱ्या दोघा व्यापाऱ्यांना अटक केल्याबाबत**

**(३९) २७२७६ (१२-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथील तापी नदी पुलावरुन डिंकाची तस्करी करुन घेवून जाणाऱ्या दोघा व्यापा-यांना वाहनांसह दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अटक करण्यात आलेल्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०१-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) मुक्ताईनगर वनक्षेत्रातील वनपाल, कुऱ्हा पानाचे यांनी प्रथम गुन्हा रिपोर्ट दिनांक ५.४.२०१५ नुसार गुन्हा नोंदवून, आरोपी यांच्या विरुध्द प्रथम श्रेणी न्यायालयात दिनांक २३.६.२०१५ रोजी न्यायालयात आरोप पत्र दाखल केले असून, न्यायालयीन केस क्रमांक ५५८/२०१५ हा आहे.

---

## पालम (जि.परभणी) येथील शासकीय दवाखान्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याने रुग्णांची होणारी गैरसोय

**(४०) २७५८२ (१७-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालम (जि.परभणी) येथील शासकीय दवाखान्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याने शस्त्रक्रियागृह, कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेची सोय नाही. अपुरा औषध पुरवठा, अपुरा कर्मचारी वर्ग व घाणीचे साम्राज्य यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून दवाखान्यांची व्यवस्था पूणपणे कोलमडली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त रुणालयातील गैरसोयी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१२-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
ग्रामीण रुग्णालय, पालम, जि.परभणी येथे सन २०१५-१६ या वर्षात माहे ऑगस्ट, २०१५ अखेर ६० महिलांवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया व ८७ रुग्णांवर लघुशस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. रुग्णालयात आवश्यकतेनुसार औषधासाठा उपलब्ध आहे. येथील मंजूर अधिकारी व कर्मचारी यांच्या २६ पदांपैकी १९ पदे भरलेली आहेत. रुग्णालयात दिवसातून दोन वेळेस स्वच्छता करण्यात येते. माहे मे, २०१५ वा त्या सुमारास या रुग्णालयाची व्यवस्था कोलमडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात लोकसहभागातून पाणलोट क्षेत्र विकास करुन त्याद्वारे उत्पन्न व उत्पादकता वाढवण्याबाबत**

**(४१) २८१७७ (२७-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लोकसहभागातून पाणलोट क्षेत्र विकास करुन त्याद्वारे उत्पन्न व उत्पादकता वाढविण्याकरिता आणि शाश्वत पद्धतीने उपजीविकेची सुरक्षितता याकरिता एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामात संस्करण करण्याकरिता निधीतूनच काही तरतूद केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय कामे करण्यात येतात,

(४) असल्यास, कामांचे वेगळ्या यंत्रणेकडून लेखापरीक्षण करुन हि कामे केली जातात काय याची शहानिशा करुन घेण्याबाबत शासनाची भूमिका काय,

(५) अद्याप शहानिशा करुन घेण्याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) व (२) होय

(३) सदर योजनेंतर्गत शेती बांध बंदिस्ती, ढाळीचे बांध, सलग समतल चर, शेततळे, भात शेती दुरुस्ती, भात खाचरे तयार करणे, अनगड दगडी बांध, लहान मातीचे बांध माती नाला बांध, नाला खोलीकरण, बोडी दुरुस्ती, इत्यादी कामे करण्यात येतात.

(४) व (५) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत विविध स्तरावर झालेल्या सर्व कामांवर केलेल्या खर्चाचे लेखापरिक्षण जिल्हानिहाय नियुक्त केलेल्या सनदी लेखापालांकडून करण्यात येते. लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची पुर्तता अनुपालन जिल्हास्तरावरील सहाय्यक लेखा अधिकारी व सबंधितांकडून करुन घेण्यात येते. जिल्ह्याचा एकत्रित लेखापरीक्षण अहवाल वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे येथे सादर केला जातो. सर्व जिल्ह्यांच्या एकत्रित लेखापरिक्षण अहवाल, राज्यस्तरावरील सनदी लेखापालामार्फत एकत्रित करुन राज्याचा एकत्रित लेखापरिक्षण अहवाल दरवर्षी केंद्र शासनास व धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना सादर करण्यात येतो.

---

**"दरी तेथे बांध" या वन व पर्यावरण संवर्धन प्रकल्पाबाबत**

**(४२) २८७६९ (१३-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा ( जिल्हा बुलडाणा) तालुक्यातील अजिंठा पर्वत रांगामध्ये वन व पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने "दरी तेथे बांध" या प्रकल्पासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून केलेली मागणी शासनास माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचा आराखडा शासनाने संबंधित विभागाकडून मागविला आहे, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास त्यानुसार सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०१-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) उप वनसंरक्षक, बुलढाणा यांच्या स्तरवर "दरी तेथे बांध" या संकल्पनेवर प्रारुप आराखडा तयार करण्याबाबत तपासणी करुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यात वनधन-जनधनाचे विक्री केंद्र सुरू करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४३) २९९३६ (०३-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वनधन-जनधनाचे विक्री केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील वनधन-जनधन योजनेंतर्गत गावागावांत समित्या स्थापन करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती सदस्यांची समिती गठीत करण्यात येणार आहे व सदरील समिती केव्हापासून कार्यरत होणार आहे, त्याचा नेमका उद्देश काय आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०२-२०१६) :**(१) नागपूर येथे प्रायोगिक तत्वावर वनधन जनधन हे किरकोळ विक्री केंद्र दिनांक १६.८.२०१५ रोजी सुरु करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील वनविभागाचे विभागीय कार्यालय मंजूरीबाबत**

**(४४) ३०७६४ (१३-०१-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील विभागीय कार्यालय मंजूरीसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाच्या कार्यालय मंजूरीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) होय.
(२) औरंगाबाद वनवृत्तात उस्मानाबाद वनविभाग हा उस्मानाबाद व लातूर अशा दोन जिल्ह्यात विभागाला असून या विभागाचे वनक्षेत्र फक्त ९०.३० चौ.कि.मी. आहे. तसेच यापूर्वी लातूर मुख्यालयासाठी सहा. वनसंरक्षकांचे १ पद स्थलांतरीत सुध्दा करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत लातूर येथे स्वतंत्र नवीन उपविभाग सुरु करण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील नान्नज येथील माळढोक पक्षी अभयारण्यातील जमीन राज्य शासनाने जमीन खरेदी-विक्री व कर्ज नोंदीसाठी परवानगी दिली असली तरी या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(४५) ३३३४८ (१३-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील नान्नज येथील माळढोक पक्षी अभयारण्यातील जमीन राज्य शासनाने जमीन खरेदी-विक्री व कर्ज नोंदीसाठी परवानगी दिली असली तरी या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माळढोक बाधित क्षेत्रातील प्रश्न मार्गी लागत नसल्याने माळढोक बाधित शेतक-यांमध्ये तीव्र असंतोष आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यशासनाने माळढोक पक्षी अभयारण्यातील जमीनीतील तांत्रिक बाबी दूर करुन शासनाच्या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली या करण्यात येत आहे,
(४) अद्‌याप, उक्त प्रश्नबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) माळढोक अभयारण्याच्या पुनर्रचनेस राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीने मान्यता दिली असून त्या अनुषंगाने सुधारीत अधिसूचना जारी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. पुनर्रचित अभयारण्यात फक्त ४८०.२९ हेक्टर खाजगी क्षेत्राचा समावेश असून त्याच्या संपादनाची कार्यवाही झालेली आहे. सदर अधिसूचना जारी झाल्यावर खाजगी जमिनीविषयक बाबींवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियमांच्या तरतूदी आकृष्ट होणार नाहीत.

---

## परभणी येथील वन विभागाचे कार्यालय हिंगोली येथे स्थलांतरित करण्याबाबत

**(४६) ३४७५१ (१३-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील कारेगाव रस्त्यावर असलेले वन विभागाचे कार्यालय हिंगोली येथे स्थलांतरित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी कार्यालय ४० वर्षापासून कार्यरत असून या कार्यालयात एकूण ४५ कर्मचारी असताना व परभणी येथे त्यांच्यासाठी निवासस्थाने असतानाही हे कार्यालय हिंगोली येथे स्थलांतरित करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हिंगोली पेक्षा परभणी जिल्ह्यातील वन विभागाचे भौगोलिक क्षेत्र जास्त आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या स्थलांतरास परभणी जिल्ह्यातील नागरिकांचा विरोध आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२९१६) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील मध्य चांदा वन विभागातील राजूरा वनपरिक्षेत्रात वनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४७) ३५०४० (१३-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मध्य चांदा वन विभागातील राजूरा वनपरिक्षेत्रात वनीकरणाच्या कामात मोठा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच यापूर्वी याच वनविभागातील धाबा वनपरिक्षेत्रातही वनीकरण कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) नाही.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा-गोंदिया जिल्हयात शासनाच्या दुर्लक्षामुळे बांबू कामगारांवर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(४८) ३६१६४ (१३-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा-गोंदिया जिल्हयातील वनविभागाकडून आलेले निर्बंध व शासनातर्फे बांबू देणे बंद केल्यामुळे व्यवसायावर अवलंबुन असलेल्या जिल्हयातील हजारो बांबू कामगारावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच ३०-३२ वर्षापासून शासनाने या बुरड कामगारांची दखल घेऊन बांबू विक्रीचे केंद्र स्थापन केले पण शासनाच्या उदासिनतेमुळे वर्षभरातच हा उपक्रम बंद करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असंघटित बांबू कामगारांसाठी वनविभागाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. निस्तार आगार (विक्री केंद्र) बंद करण्यात आलेले नसून या निस्तार आगारावरुन बुरुड कामगारांना बांबू पुरवठा करण्यात येतो.
(३) व (४) बुरुड कामगारांना निस्तार दरावर नियमितपणे बांबू पुरवठा करण्यात येत आहे.

---

**मौजा दातोडी (ता. आर्णी, जि. यवतमाळ) येथील जंगलातील फुटलेल्या तलावाचे रुंदीकरण व नुतनीकरण करण्याबाबत**

**(४९) ३६८३५ (१३-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा दातोडी (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे जंगलातील फुटलेल्या तलावाचे रुंदीकरण व नुतनीकरण संदर्भात लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी (दक्षिण आर्णी) यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मौजे दातोडी वनपरिक्षेत्र (दक्षिण आर्णी) येथील तलाव दुरुस्त करण्याची मागणी जुनीच आहे. सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्याकरिता सध्या पुरेसा निधी उपलब्ध नाही. तसेच सदरचे गाव जलयुक्त शिवार अभियानात समाविष्ट नसल्याने ही अंदाजपत्रके पुढील कार्यवाहीकरिता जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आलेली नाही.

---

**कसारा (जि.ठाणे) वन विभागाच्या वन परिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जंगल तोड होत असल्याबाबत**

**(५०) ३७८५७ (१३-०१-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कसारा (जि.ठाणे) वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे मौजे खर्डी, कसारा, शिरोळ, विहीगांव, वाशाळा वन परिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जंगल तोड होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जंगल तोडीमुळे वनस्पती तसेच साग, धावडा यासारखे वृक्ष नष्ट झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर शासनाने काय उपाययोजना व कारवाई केली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०२-२०१६) :**(१) स्थानिक रहिवाशी यांचंकडून जळाऊ सरपण, शेतीची अवजारे, मांडव व इतर दैनंदिन गरजांसाठी खालीलप्रमाणे वृक्षतोड झाली आहे.

| परिक्षेत्र | वृक्षतोड संख्या | नुकसानी किंमत | बुडाजवळील जप्त मालाची किंमत |
|---|---|---|---|
| खर्डी | १४ | ४७२७ | ४२९४ |
| विहिगाव | ९ | २०३४ | ९०७ |
| वाशाळा | १३ | १४२९ | १२१५ |
| एकूण | ३६ | ८१९० | ६४१६ |

(२) यामध्ये साग -२, ऐन-२०, हेदू-३, पळस-१ धावडा-२ इंजायली-६, सावर-१ व शिरस-१ असे एकूण ३६ वृक्षांची तोड झाली आहे.
(३) अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केली आहे.

- संवेदनशील/अतिसंवेदनशील नियतक्षेत्रांची नियमितपणे तपासणी करणेत येते.
- वनोपज तपासणी नाक्यांवर संशयास्पदरित्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येते.
- रात्रगस्त घालणे, संशयीत ठिकाणी अचानक धाडी घालणे, नाकाबंदी करणेची कार्यवाही केली जाते.

- वनगुन्ह्यात सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर पाळत ठेवली जाते.
- ग्रामीणांच्या सहभागातून वन व्यवस्थापन या कार्यक्रमाविषयी जनजागृती, वनसंरक्षण समित्यांचा वनसंरक्षणाचे कामात सक्रिय सहभाग घेण्यात येतो.
- वनगुन्हा नोंदविण्यात आल्यावर त्याबाबत समरी ट्रायल्सच्या तरतुदीनुसार न्यायालयाचे लक्ष वेधून तात्काळ कारवाई करणेत येते.
- वनसंरक्षणासाठी फिरते पथक कार्यरत आहेत.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.